## हमीभाव

## मुक्तअर्थव्यवस्था आणि शेतकरी- विजय जावंधिया

शेतीमालाला भाव न देणे हे सरकारची अधिकृत धोरण आहे. हे शेतक-यांच्या मनातील भाव शेतकरी संघटनेच्या माध्यमातून संघटित शक्तीने मांडले व म्हणूनच शेतक-यांचा प्रचंड प्रतिसादही मिळाला परंतु, 1991 नंतर देशात मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचा प्रारंभ झाला, खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या चर्चेत शेतक-यांची दिशाभूल करण्याचा ठेका स्वतंत्र भारत पक्षाची स्थापना करुन श्री शरद जोशी यांनी घेतला, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

1 जानेवारी 1995 ला विश्व व्यापार संघटनेची स्थापना झाली. या संघटनेच्या माध्यमातून जगातील सर्व व्यापाराचे नियमन करण्यात येईल व विकसनशील व अविकसित देशांचा निर्यात व्यापार वाढेल व गरीबी, बेकारी दूर करण्यात येईल, असे स्वप्न दाखविण्यात आले होते. परंतु, आज (2008) 13 वर्षानंतरची वास्तविकता हीच आहे की, तथाकथित मुक्त व्यापार वास्ततिकतेत प्रारंभ झालाच नाही, उलट श्रीमंत विकसित देशांचीच मक्तेदारी वाढली.

श्रीमंत व विकसित देशातील शेतक-याच्या सबसिडी कमी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, ते पाळण्यात तर आलेच नाही, उलट ते सबसिडी देण्याचे धोरण गरीब देशांच्या हिताचे कसे आहे, हाच तर्क सतत मांडण्यात येत आहे. विश्व व्यापार संघटनेच्या दोहा (कर्तार) येथे झालेल्या मंत्रिस्तरीय बैठकीत दोहा विकासात्मक मसुदा तयार करण्यात आला होता. या मसुद्यावर अजून एकमत होत नाही. अनेक देशांनी अमेरिका, युरोपच्या शेतक-यांना प्रचंड सबसिडी दिली जाते. त्यावर आक्षेप घेतला आहे परंतु, त्या सबसिडी कमी करण्यासाठी सतत टाळाटाळ करण्यात येत आहे. नुकतीच जून 2008 ला स्वित्झर्लंडच्या जिनेव्हा येथील विश्व व्यापार संघटनेच्या मुख्यालयात झालेल्या मंत्रिस्तरीय बैठकीतही या विषयावर एकमत झाले नाही व चर्चा असफल ठरली. या असफल बैठकीनंतर गरीब देशांमध्ये फूट पाडण्याचे प्रयत्न श्रीमंत देशांनी सुरु केले आहेत. पुनश्च हा तर्क पुढे करण्यात येत आहे की श्रीमंत औद्योगिक प्रगत देशांच्या शेतक-यांना दिली जाणारी सबसिडी गरीब देशाच्या गरीब जनतेच्या हिताचीच आहे, कारण त्यामुळेच त्यांना स्वस्त धान्य उपलब्ध असते. परंतु, हे स्वस्त धान्य आयात केले तर स्थानिक उत्पादकांची लूट वाढते व स्थानिक धान्य उत्पादन बंद पडते. यातून निर्माण होणारी बेकारी, गरिबीच वाढवते असा अनुभव अनेक देशांनी 1995 नंतर 2004 पर्यंतच्या जागतिक मंदीच्या काळात घेतला आहे. 2005 नंतर जागतिक बाजारात सर्वच शेतमालाच्या भावात तेजीचे वातावरण तयार झाले. त्यामुळे स्वस्त आयातीवर निर्भर असणारे अनेक गरीब देश संकटात आले. जागतिक बाजारात 90 डॉलर्स प्रतिटन (10 क्विंटल) पर्यंत कमी झालेले गव्हाचे भाव 400-450 डॉलर प्रतिटनपर्यंत वाढले. भारतात प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयींचे सरकार होते तेव्हा 90 डॉलर प्रतिटनाप्रमाणे गव्हाची निर्यात केली होती व आज जे डॉ. मनमोहनसिंग यांचे सरकार आहे, त्यांना 400 डॉलर प्रतिटनाप्रमाणे गव्हाची आयात करावी लागली. निर्यातीतही तोटा व आयातीतही तोटा हे जागतिकीकरण कुणाच्या हिताचे ? आफ्रिकेच्या अनेक देशात स्वस्त मक्याची आयात झाली व स्थानिक उत्पादन बंद झाले व तेजीच्या काळात महाग मका आयात करुन अर्थव्यवस्थाच धोक्यात आली. धान्यासाठी दंगे होऊ लागले, कापूस उत्पादक आफ्रिकेचे देश माली, युक्रीनो, फासो, बेनीन, मोझेम्बीक यांनी अमेरिकेच्या कापूस उत्पादकांना दिल्या जाण-या प्रचंड सबसिडीचा कडवा विरोध सुरु केला आहे.

जागतिक व्यापार संघटनेचा या 13 वर्षांचा अनुभव हेच सांगतो की, जागतिक व्यापार संघटना ही जगातील गरिबी- बेकारी दूर करण्यासाठी स्थापन झालेली नाही, तर श्रीमंत देशांचे आर्थिक हित रक्षण करण्यासाठी नववसाहतवादी धोरण राबविणारी संस्था आहे. 1997 ते 2005 पर्यंत जागतिक बाजारात सर्वच शेतमालाच्या भावात मंदी होती. 2006 नंतर जागतिक व्यापारात तेजीचे वातावरण सुरु झाले. क्रुड ऑईलचे भाव (पेट्रोल-

डिझेल) विक्रमी स्तरापर्यंत-147 डॉलर प्रतिबॅरलपर्यंत वाढले.

अमेरिकेने या भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी मक्यापासून इथेनॉल तयार करण्याचे धोरण जाहीर केले व मक्याच्या शेतीला प्रचंड सबसिडी दिली. त्यामुळे गव्हाचे, कापसाचे, सोयाबीनचे उत्पादन अमेरिकेत कमी झाले. याच काळात ऑस्ट्रेलियात सलग 2 वर्ष दुष्काळ पडला. युरोपने इंडोनेशिया-मलेशियातून पाम तेल आयात करुन त्यापासून बायो-डिझेल तयार करण्याचे धोरण स्वीकारले. या सर्वांचा एकत्र परिणाम असा झाला की, सर्वच शेतमालाच्या भावात जागतिक बाजारात तेजीची लाट आली. पाम तेलाचे भाव 280 ते 300 डॉलर प्रतिटनावरुन 1400 डॉलर प्रतिटन झाले. डाळींचे भाव 400 डॉलर प्रतिटनावरुन 600 ते 650 डॉलर प्रतिटन झाले. गव्हाचे भाव 400 डॉलर प्रतिटन, तर तांदळाचे भाव 1000 डॉलर प्रतिटनापर्यंत (40 रु. किलो) वाढले. कापसाचे भावही 50 ते 52 सेंट प्रतिपाऊंड रुईवरुन 72 सेंटपर्यंत वाढलेत. या सर्वांचा एकत्रित परिणाम भारतात सर्वच शेतमालाचे भाव वाढू लागले. बाजारात शेतक-यांना मिळणारा गव्हाचा भाव 1100-1200 रु. प्रतिक्विंटल, कापसाचा भाव 2000-2500 रु. प्रतिक्विंटलपर्यंत वाढले. भारत सरकार स्वस्त शेतमालाची आयात करुन भाव पाडण्याचे प्रयत्न नेहमीच करीत असते ते प्रयत्न या भाववाढीमुळे यशस्वी झाले नाही. सरकारने आयात कर शून्य करुन पाहिला, पण तोही यशस्वी झाला नाही. गव्हाची, डाळींची, तांदळाची खाद्यतेलांची निर्यातही सरकारने बंद करुन ठेवली आहे.

जागतिक बाजारातील या तेजीमुळे स्थानिक उत्पादन वाढविण्याचे महत्व सरकारच्या लक्षात येऊ लागले. शेतक-यांच्या आत्महत्या व घटते उत्पादन यामुळे शेतीमालाचा हमीभाव वाढविण्याच्या मागणीला महत्व आले. प्रधानमंत्री डॉ. मनमोहनसिंगजी 30 जून 2006 ला वायफडला (वर्धा) आले होते. तेव्हा त्यांच्यासमोर मी हा मुद्दा अत्यंत स्पष्टपणे मांडला होता. डॉ. मनमोहनसिंगजींनी कृषी मूल्य व लागत आयोगाच्या कार्यपध्दतीत बदल करण्याचे मान्य केले होते. 2008-2009च्या हंगामासाठी जे हमीभाव सरकारने जाहीर केले आहेत. 30 ते 80 टक्के वाढवून जाहीर केले आहेत. उदाहरणार्थ, गव्हाचे हमीभाव 750 रु. वरुन 1000 प्रतिक्विंटल, कापासाचे भाव 1800-2000 रु. वरुन 2500 ते 3000 रु. प्रतिक्विंटल, सोयाबीनचे भाव 1600 ते 1700 रु. वरुन 2500 रु. प्रतिक्विंटल जाहीर केले आहेत.

जागतिक बाजारात तेजी होती. त्यामुळे या वाढीव भावाचे महत्व वाटत नव्हते. परंतु, मागील दोन महिन्यातच जागतिक बाजारात पुनश्च मंदीची लाट आली आहे. खाद्य तेलाचे भाव 1400 डॉलरवरुन 450 डॉलरपर्यंत घसरले आहेत. कापसाचे भाव 72 सेंटवरुन 56 सेंटपर्यंत, गव्हाचे भाव 400 डॉलरवरुन 250 डॉलरपर्यंत घसरले आहेत. या मंदीमुळे भारत कापसाचे भाव हमी किंमतीपेक्षाही कमी झाले आहेत. मुक्त अर्थव्यवस्थेचे समर्थकही कापसाची हमी किंमतीत सरकारने खरेदी करावी ही मागणी सुरु केली आहे. या जागतिक मंदीने मुक्त अर्थव्यवस्थेच्या समर्थकांच्या थोबाडीतच हाणली आहे. पाचव्या-सहाव्या वेत आयोगाच्या पार्श्वभूमीवर तर तथाकथित मुक्त अर्थव्यवस्थेतही कृषी मूल्य व लागत आयोगाचा शेतकरी हिताचा हस्तक्षेप आवश्यकच आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे. साखर निर्यातीला मागील दोन वर्ष सरकारने 1450 रु. प्रतिटनापर्यंत सबसिडी दिली नसती तर मुक्त अर्थव्यवस्थेत ऊस उत्पादकाचे काय हाल झाले असते ?

ज्या देशांत 70 टक्के लोकांजवळ दोन वेळचे जेवण विकत घेण्याची क्रयशक्तीच नाही, त्या देशात बाजार व्यवस्था, मुक्त अर्थव्यवस्था शेतक-यांचे हितरक्षण कसे करणार ? हाच लाखमोलाचा प्रश्न आहे. तूर्त एवढेच.

विजय जावंधिया
शेतकरी संघटना पाईक,
रायनगर, वर्धा.